| | | | |
|---|---|---|---|
| MHSN030023222024 | दाखल दिनांक | : | १०/०७/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | २९/०७/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०८/०५/२०२६ |
| | कालावधी : ०१ व. ०९ म. २८ दि. | | |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सांगली (न्यायालय क्र. ५) यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी ओंकार संजय शास्त्री)**

न्यायनिर्णय तारीख : ०८/०५/२०२६

नियमित फौजदारी खटला क्र.३८२/२०२४

निशाणी : ३९

(सांगली शहर पोलीस ठाणे गु.र.नं.१८०/२०२४)

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस निरीक्षक, सांगली शहर पोलीस ठाणे यांचेमार्फत |
| अभियोग पक्षातर्फे वकील | | सहा. सरकारी वकील श्री.एम.डी.बागल |
| आरोपी | | **१. प्रदीप गौरीहर शेटे**<br>वय : ४२ वर्षे, धंदा : टायपिंग सेंटर<br>रा. मंगलमुर्ती निवास, आण्णा सदगोंडा पाटील नगर, कोल्हापूर रोड, सांगली<br>**२. प्रमोद आण्णा सावळगे**<br>वय : ३६ वर्षे, धंदा : गाडी व्यवसाय<br>रा. आकाशगंगा पिठाची गिरणीसमोर, चिंतामणनगर, सांगली |

| | | |
|---|---|---|
| | | **३. फिरोज गुलाब मुजावर**<br>वय : २८ वर्षे, धंदा : ड्रायव्हर<br>रा. मणेराजुरी, ता. तासगाव, जि. सांगली<br>**४. अक्षय बसवराज कोरे**<br>वय : २४ वर्षे, धंदा : ड्रायव्हर<br>रा. सोनाई पार्क, वृध्दाश्रमजवळ, कुपवाड रोड, सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री.आर.आर.शिंपी |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०३/०४/२०२४ |
| एफ.आय.आर. तारीख | ०४/०४/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १०/०७/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०८/०५/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०९/०४/२०२६ |
| निकाल राखून ठेवलेली तारीख | ०८/०५/२०२६ |
| निकालाची तारीख | ०८/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडलेली तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी फौ.प्र.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | कलम ४२८ प्रमाणे |
| १. | प्रदीप गौरीहर शेटे | -- | -- | भा.दं.वि. ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | -- | -- |
| २. | प्रमोद आण्णा सावळगे | -- | -- | वरील प्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| ३. | फिरोज गुलाब मुजावर | -- | -- | वरील प्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| ४. | अक्षय बसवराज कोरे | -- | -- | वरील प्रमाणे | निर्दोष | -- | -- |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. फिर्याद पक्ष

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचा तपशील |
|---|---|---|
| १. | संदीप धनशेट्टी शेटे (नि.३५) | वर्दीदार |

| | | |
|---|---|---|
| २. | धनश्री संदीप शेटे (नि.३६) | प्रत्यक्षदर्शी |
| ३. | सचिन श्रीशैल अथणी (नि.३७) | साक्षीदार |

## निशाणी पडलेले कागद

**अ. फिर्याद पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी.१/पी.डब्ल्यू.१ | फिर्यादवरील सही |
| २. | पी.२/पी.डब्ल्यू.१ | वर्दीजबाबावरील सही |
| ३. | पी.३/पी.डब्ल्यू.२ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |

## न्यायनिर्णय

**(घोषित तारीख : ०८/०५/२०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.दं.वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे –</u>**

२. दिनांक ०४/०४/२०२४ रोजी १७.०० वाजताच्या सुमारास सांगली राजवाडा येथील जुन्या कोर्टाच्या इमारतीजवळ असलेल्या सांगली बार असोसिएशन, सांगली या उत्तराभिमुखी इमारतीच्या समोर आरोपी क्र.१ याने फिर्यादी हे त्यांचे राजवाडा येथील दुकानात काम

करत असताना त्या ठिकाणी दारु पिवून येवून त्याच्यावर फिर्यादीचे मेहुण्याने केलेली तक्रार मागे घे असे म्हणून फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन तेथे जवळच पडलेली लाकडी काठी घेवून त्यांच्या हातावर व पायावर मारुन फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी येवून देवून गेला. त्यानंतर पुन्हा आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.२ ते ४ यांचेशी संगणमत करुन पुन्हा फिर्यादीचे दुकानाजवळ राजवाडा सांगली येथे येवून फिर्यादी हे दुकानात बसताना फिर्यादी यांना बाहेर बोलवून त्यांना लाथबुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीसोबत असलेली त्यांची पत्नी व इतर फिर्यादीस सोडवण्यास गेले असता आरोपी क्र. ३ व ४ यांनी त्यांना उंडगे, रांड अशी शिवीगाळ केली. त्यामुळे, फिर्यादीने आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये फिर्याद दाखल केली.

३. सदर गुन्ह्याचा तपास श्री.ए.एम.लोहार, स.फौ.पोलीस, सांगली शहर पोलीस ठाणे यांनी केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, मुद्देमाल जप्त केला. चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. निशाणी १८अ कडे भा.दं.वि.कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार आरोपींवर दोषारोप ठेवणेत आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची संमती दर्शविली. गुन्ह्यामध्ये गोवविण्याइतपत पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

४. प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसह

खालीलप्रमाणे दिले आहेत–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी फिर्यादीच्या उजव्या करंगळीवरील हाडावर लाकडी दांड्याने मारुन गंभीर दुखापत केली व त्यायोगे त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी... |
| २. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी वर्दीदार यांना काठीने मारहाण करुन जखमी केले त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी... |
| ३. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी गुन्हा करण्याच्या समान उद्देशाने वर्दीदार यांना इच्छापूर्वक दुखापत केली आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी... |
| ४. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी गुन्हा करण्याच्या समान उद्देशाने वर्दीदार याचा उद्देशपूर्वक अपमान केला व त्यायोगे त्याला प्रशोभित केले जेणेकरुन त्याच्याकडून सार्वजनिक | नकारार्थी... |

| | | |
|---|---|---|
| | शांतता भंग व्हावी किंवा इतर कोणताही अपराध घडावा असा त्यामागे उद्देश होता आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | |
| ५. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी गुन्हा करण्याच्या समान उद्देशाने वर्दीदार याला फौजदारीपात्र धाकदटपशाह करुन जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी... |
| ६. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ६ बाबत –**

५. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने फिर्यादी, त्याची पत्नी व मेहुणा यांना तपासलेले आहे. त्यापैकी फिर्यादीने आपल्या सरतपासात असे कथन केले आहे की, एप्रिल २०२४ मध्ये एके दिवशी संध्याकाळी ५.३० ते ६.०० च्या दरम्यान दुकानाच्या वाटपावरुन त्यांची व आरोपीची किरकोळ वादावादी झाली होती. परंतु वादावादी नंतर ते दोघेही तिथून निघून गेले. आरोपी क्र.१ ते ४ यांनी त्यांना

व त्यांच्या पत्नीला मारहाण केली, धमकी दिली शिवीगाळ केली असे काही घडले नाही. त्यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात केवळ आरोपीबरोबर झालेल्या किरकोळ वादावादीमुळे फिर्यादी दिली होती. त्यामुळे, त्यांना सदर फिर्यादीमधील मजकूर ठाऊक नसल्याचे कथन त्यांनी केले. साक्षीदार क्र.२ धनश्री ही फिर्यादीची पत्नी आहे. तिने देखील आपल्या सरतपासात एप्रिल २०२४ मध्ये त्यांच्या पतीची व आरोपी क्र.१ ची दुकानाच्या वाटपावरुन किरकोळ वादावादी झाली होती असे कथन केले होते. मात्र, आरोपी क्र.१ ते ४ यांनी त्यांना व त्यांच्या पतीला मारहाण केली, शिवीगाळ केली, धमकी दिली असे काही घडले नाही. तसेच त्यांच्या पतीने आरोपीबरोबर झालेल्या किरकोळ वादावादीमुळे पोलीसात फिर्याद दाखल केली होती हे कथन केले. साक्षीदार क्र.३ सचिन हा फिर्यादीचा मेहुणा आहे. त्याने देखील फिर्यादीने आरोपी क्र.१ सोबत झालेल्या किरकोळ वादावादीमुळे त्यांनी पोलीसात फिर्याद दिल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने देखील आरोपींनी साक्षीदार क्र.१ व २ यांना मारहाण करुन, शिवीगाळ करुन, धमकी दिल्याचे नाकारले आहे.

६. वरील तीनही साक्षीदार आपल्या पुर्वकथनास विसंगत अशी साक्ष देत असल्याने सहा. सरकारी वकीलांनी विस्तृत स्वरुपात त्यांचा उलटतपास नोंदवला. मात्र, त्यातूनही अभियोगपक्षास सहाय्य करेल असा कोणताही मजकूर अभिलेखावर आलेला नाही. त्याचबरोबर फिर्यादी व आरोपींनी निशाणी ३४ कडे संयुक्तीक पुरसिस दाखल करुन त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे व सदरचा खटला पुढे चालविण्याचा नसल्याचे सांगितले. आरोपीच्या वकीलांनी अभिलेखावरील पंचनामा, साक्षीदारांचे वैद्यकीय प्रमाणपत्रे मान्य केल्याने त्याला निशाणी देण्यात आली. मात्र, त्यामुळे, फिर्यादी व त्याच्या पत्नीला झालेल्या जखमा

या आरोपींनी केलेल्या मारहाणीमुळेच झाल्या ही बाब सिध्द होत नाही. या व्यतिरीक्त इतर साक्षीदारांना साक्षीसमन्स काढण्याचे आदेश देवूनही ते न्यायालयात हजर राहिले नाहीत. त्यामुळे, सदरची बाब व उभय पक्षांमधील निशाणी ४५ वरील तडजोड पुरसिसचे अवलोकन करता सदर खटला पुढे चालवूनही अभियोगपक्षास सहाय्यकारी तथ्ये अभिलेखावर येवू शकत नाहीत. यदाकदाचित अशी कोणतीही तथ्ये न्यायालयासमोर आल्यास वर नमूद केलेल्या बाबी त्याच्याशी विसंगत ठरणार आहेत. त्यामुळे, शेवटी त्याचा फायदा आरोपीला देणे बंधनकारक राहणार आहे. अशा वेळी सदर प्रकरणात होवू शकणारा विलंब टाळण्याच्या दृष्टीने आरोपींना संशयाचा फायदा देवून निर्दोषमुक्त करणे योग्य राहणार आहे. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.६ बाबत खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यांतून निर्दोषमुक्त करणेत येत आहे.

२. आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. प्रस्तुत कामी एम.आर.क्र.६२/२०२४ मधील जप्त करणेत आलेली लाकडी भरीव काठी / पट्टी मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावे.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी रु.१५,०००/- चे बंधपत्र व

जामीनपत्र पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता देणेत यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये घोषित करणेत आला.)

ONKAR SANJAY SHASTRI
Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2026.05.08 15:12:14 +0530

सांगली.                                        (ओंकार संजय शास्त्री)

दिनांक : ०८/०५/२०२६                 प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली

(न्यायालय क्र.५)

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | 5th Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Sangli |
| Date | : | 08/05/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 08/05/2026 |
| Order uploaded on | : | 08/05/2026 |